महात्माफुले चौक पोलीस स्टेशन,कल्याण (प) ब पत्रक दिनांक १२/११/२०२४

| | | |
|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे | महात्माफुले चौक पोलीस स्टेशन,कल्याण (प) |
| २ | गु.रजि.नं व कलम | १२२१/२०२४ बी.एन.एस ३४३, ३(५) सह मुंलाची काळजी व सारक्षण कायदा २०१५ चे कलम ८१,८७ प्रमाणे |
| ३ | फिर्यादीचे नाव व पत्ता | भाग्यश्री हितेश पाटील, महिला पोलीस अंमलदार/४७४५, वय ३३ वर्ष, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखा, ठाणे शहर |
| ४ | आरोपीचे नाव व पत्ता | १) वैशाली किशोर सोनावणे वय– ३५ वर्षे, धंदा गृहीणी रा. सिध्दार्थ नगर, झोपडपट्टी, कोपररोड, समाज मंदिराचे बाजुला, विष्णुनगर, डोबिवली (दलाल व पैसे स्विकारणारी) मुळ गाव–मालेगाव, जि. नाशिक<br>२) सौ. दिपाली अनिल दुसिंग वय– २७ वर्षे, धुदा–गृहीणी, रा. रा. सिध्दार्थ नगर, झोपडपट्टी, कोपररोड, समाज मंदिराचे बाजुला, विष्णुनगर, डोबिवली, मुळ गाव–जेतोननगर, द्वारका हॉटेल, नाशिक<br>३) रेखा बाळु सोनावणे, वय–३२ वर्षे, धंदा भिक मागणे, रा. कल्याण रेल्वे स्टेशन, प्लॅट फॉर्म नं १ (तिच्या ताब्यात एक महिना १२ दिवस वयाचे स्त्री जातीचे लहान बाळ )<br>४) किशोर रमेश सोनावणे, वय–३४ वर्ष, धंदा–रिक्षा चालवणे, रा. सिध्दार्थ नगर, झोपडपट्टी, कोपररोड, समाज मंदिराचे बाजुला, विष्णुनगर, डोबिवली मुळ गाव–मालेगाव, जि. नाशिक |
| ५ | अटक ता. वेळ | आरोपी आटक करण्यात आलेले आहे. आटक दि. स्टे डा नं. ०६/०१:१० टाईम |
| ६ | अ.घ.ता वेळ व ठिकाण | दिनांक १२/११/२०२४ रोजी १४.१० वा ''रामदेव हॉटेल समोर, सहजानंद चौक, आग्रारोड कल्याण (प)'' |
| ७ | दाखल तारीख व वेळ | दिनांक १२/११/२०२४ रोजी २३:२२ वाजता स्टे.डा नंबर ६१ अन्वये. |
| ८ | **ताब्यातुन जप्त करण्यात** आलेल्या मालाचे वर्णन | **आरोपीत वैशाली किशोर सोनवणे हीचे ताब्यातुन जप्त करण्यात आलेला मुद्देमाल**<br>१) २,०००/– रु. रोख त्यात प्रिरेड पंचनाम्यात बनावट ग्राहक याचेकडे असलेली रोख रक्कम<br>२) ३,०००/–रू.किं.चा मोबाईल.<br>३) २०.००/–रू.इतर रोख रक्कम.<br>**आरोपीत किशोर रमेश सोनवणे याचे ताब्यातुन जप्त करण्यात आलेला मुद्देमाल**<br>४) १,०००/–रू.किं.चा मोबाईल फोन.<br>५) ३५,०००/–रू.किंमतीची ऑटो रिक्षा.<br>———————<br>**४१,०२०/–रू.एकूण**<br>**आरोपी नं २ व ३ यांचे अंगझडती घेतली असता त्यांचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने उपयुक्त असे काहीएक मिळुन आले नाही.** |
| ९ | मिळाला माल | निरंक |
| १० | विलंबाचे कारण | तात्काल |
| ११ | गुन्हयाची पध्दत | आपआपसात संगणमत करून, लहान बाळाची विक्री करणे |
| १२ | थोडक्यात हकीगत | ता.म.वेळी व जागी यातील अरोपीत यांनी आपसात संगनमत करुन स्त्री जातीचे लहान बाळ वय अंदाजे ४१ दिवस हिची विक्री करण्यासाठी वर नमुद आरोपी यांनी आपआपसात संगणमत करून, बालकाच्या जन्माबाबत अगर दत्तक विधानाबाबत कोणत्याही प्रकारची कागदपत्रे न देता, खाजगी इसमाकडुन ४,००,०००/– रू. (२,०००/– रू किंमतीच्या भारतीय चलनातील ५०० रू दराच्या नोटा व कोरे कागद लावुन बनावट २ बंडल तयार केलेले) स्विकारून बाळ बनावट ग्राहकाच्या ताब्यात देवुन लहान बाळाची विक्री केली म्हणुन म्हणून गुन्हा. |
| १३ | दाखल अधिकारी | म.पोउपनिरी/प्रतीभा माळी, नेम–महात्माफुले चौक पोलीस ठाणे कल्याण |

| | | |
|---|---|---|
| १४ | तपास अधिकारी | मपोउपनिरी/स्नेहल शिंदे, नेम—ए.एच.टी.यु.गेन्हे शाखा. ठाणे मो नं ७३८७७७२८६२ |
| १५ | घटनास्थळास भेट | १) वपोनि/ज्ञानेश्वर साबळे, नेम—महात्माफुले चौक पोलीस ठाणे कल्याण<br>२) सपोनि/स्वप्निल भुजबळ नेम—महात्माफुले चौक पोलीस ठाणे कल्याण<br>३) म.पोउपनिरी/माळी, नेम—महात्माफुले चौक पोलीस ठाणे कल्याण<br>४) मपोउपनिरी/स्नेहल शिंदे, नेम—ए.एच.टी.यु.गेन्हे शाखा. ठाणे<br>भेटीची वेळ २३:३० पासून पुढे |
| १६ | सद्यस्थिती | तपासावर |

**फिर्याद** दिनांक :— १२/११/२०२४

मी भाग्यश्री हितेश पाटील, महिला पोलीस अंमलदार/४७४५, वय ३३ वर्ष, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखा, ठाणे शहर समक्ष हजर राहुन सरकारतर्फे फिर्याद देते की,

मी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखेमध्ये एक वर्षा पासुन कर्तव्य करीत आहे. दिनांक १२/११/२०२४ रोजी मी सकाळी ०९.०० वाजता कर्तव्यावर हजर झालो. कार्यालयात हजर असताना वपोनिरी/चेतना चौधरी यांनी त्यांचे एएचटीयु, गुन्हे शाखेतील, पोलीस अधिकारी/अंमलदार त्यात मपोउपनिरी/स्नेहल शिंदे, पोउपनिरी/डी.व्ही.चव्हाण, श्रेणी पोउपनिरी /एन.डी.क्षिरसागर, मसपोउपनिरी/श्रध्दा कदम, सपोउपनिरी/डी.के.वालगुडे, सपोउपनिरी/डी.जे.भोसले, सपोउपनिरी /डी.एस.मोहिते, पोहवा/११५० के.बी. पाटील, मपोअंम/८१३१पी.जी.खरात, मपोअंम/२१७ एच.आर.थोरात, मपोअंम/४६८४ के.एम. चांदेकर, चापोशि/८१७४ यु.एम.घाडगे तसेच पंच क्र १) अम्मी केतन शहा, वय ५० वर्षे, धंदा समाजसेवीका, रा. ०००१/१५७ से. ५, शांतीनगर, रसाळ भवन रोड, मिरारोड चारकोप, कांदिवली (प), मुंबई नंबर ६७ (मो. नं.७०२१२३८३३८) २) श्री. मुकेश रोशनलाल लागडा, वय ४३ वर्षे, धंदा व्यापार, रा. ओमसाई अपार्टमेंट, बि विंग, रूम नंबर ३०५, गणेश चौक, चारकोप, कांदिवली (प), मुंबई नंबर ६७ (मो.नं. ८२९१८७३४०९) तसेच बनावट ग्राहक श्री. रफिक हज्जु शेख, वय ४२ वर्षे, धंदा. रेस्क्यु फाऊंडेशन, रा. प्लॉट नं.३९, आशाकिरण बिल्डींग, लेडी फातीमा रोड, पोईसर, कांदिवली पश्चिम मुंबई यांचीही ओळख करुन दिली.

वपोनिरी/चेतना चौधरी यांनी वर नमूद पथकास व पंचाना अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियमान्वये ''विशेष पोलीस अधिकारी'' म्हणून अधिकार प्राप्त असल्याचे सांगून पुढे सांगितले की, त्यांना त्यांचे गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली की, 'कल्याण येथे राहणारे वैशाली सोनावणे (मो.नं. ८५९१८८९५०८) व तीचे पती किशोर सोनावणे असे दोघे मिळुन स्त्री/पुरुष जातीच्या लहान बाळाची कोणत्याही कागदपत्रांची पुर्तता न करता विक्री करत आहेत' त्याप्रमाणे सदर इसमांवर कारवाई करून पंचनामा करावयाचा असल्याने त्यानुसार पंचनामा केला.

त्यांनतर पंचासमक्ष बनावट ग्राहक नामे श्री.रफिक हज्जु शेख, वय ४२ वर्षे, धंदा. रेस्क्यु फाऊंडेशन, रा. प्लॉट नं.३९, आशाकिरण बिल्डींग, लेडी फातीमा रोड, पोईसर, कांदिवली पश्चिम मुंबई. याचे मोबाईल नंबर ८४३३९५१३१० या वरून समोरील 'वैशाली नावाची महिला हिचे मोबाईल नंबर ८५९१८८९५०८ यावर संपर्क केला असता वैशाली हिने बनावट ग्राहक यांना सांगितले की, आमचे कडे २ महिन्याचे स्त्री जातीचे लहान बाळ असुन बाळाच्या आईकडे आहे ती बाळास घेवुन येईल. त्याचे तुम्हाला ४,००,०००/— रु. (चार लाख) दयावे लागतील. त्यावर बनावट ग्राहकाने होकार दिल्या नंतर दलाल वैशाली हिने सांगितले की, माझे पती किशोर, माझी मामे बहीण दिपाली व बाळाची आई रेखा असे आम्ही बाळाला घेवुन कल्याण येथिल रामदेव हॉटेल जवळ येतो तेथे तुम्ही पैसे घेवुन या असे सांगितले.

सदर कारवाई करीता वपोनिरी/चेतना चौधरी यांनी सांगितल्याने समक्ष पंचांची व बनावट ग्राहक यांची अंगझडती घेतली असता, त्याचेजवळ आक्षेपार्ह असे काही मिळून आले नाही. एवढया मोठया रक्कमेची ताबडतोब व्यवस्था करणे शक्य नसल्याने वपोनिरी/चेतना चौधरी आम्ही पंच, तसेच बनावट ग्राहक यांचेशी विचार विनीमय करून गोपनीय फंडातुन भारतीय चलनातील रु. ५०० रुपये दराच्या ०४ नोटा त्यांचे क्रमांकात अनुक्रमे १) 3HP 072269 २) 6TE 523434 ३) 2AF 669918 ४) 3BP 981686 असे एकुण २,००० रुपये घेतले. ठरल्याप्रमाणे चार लाख रूपये भासवण्यास ५००/—रू. दराची एक चलनी नोट वरील बाजूस व एक चलनी नोट खालील बाजूस व त्याचे मध्यभागी ५००/—रू.दराच्या नोटाचे आकाराचे ३९८ कोरे कागद ठेवून त्याचे दोन लाख रूपयाचे बनावट बंडल असे एकूण २ बंडल तयार केले. त्यापैकी बंडल नं.१ चे वरील ५००/—रू. दराचे चलनी नोटेचा नंबर 3HP 072269 व खालील नोटेचा नंबर 6TE 523434, बंडल नं.२ चे वरील ५००/—रू. दराचे चलनी नोटेचा नंबर 2AF 669918 व खालील नोटेचा नंबर 3BP 981686 असे एकूण २ बंडल सफेद रंगाचे प्लॅस्टीकचे पिशवीत ठेवून बनावट ग्राहक यांचे ताब्यात दिली.वपोनिरी/चेतना चौधरी यांनी पोलीस पथकास, बनावट ग्राहकास व पंचास करावयाच्या कारवाईबाबत खालील प्रमाणे सुचना दिल्या

बातमीतील ठिकाण हे महात्मा फुले चौक पोलीस स्टेशनचे हददीत येत असल्याने वरील प्रमाणे कार्यवाही झालेनंतर कार्यालयात प्रिरेड पंचनामा संगणकावर टंकलिखीत करून बातमीतील घटनास्थळी कारवाई करणेकरीता रवाना झाले बाबतची १०.४५ वा. ठाणे दैनंदिनीत नोंद करून, शासकीय वाहन क्र.एम.एच.०४/एल.बी.२४७४ व मिळेल त्या भाडयाचे रिक्षाने छापा कारवाईसाठी आवश्यक साहीत्यासह पोलीस, आम्ही पंच, बनावट ग्राहक असे ''रामदेव हॉटेल समोर, सहजानंद चौक, आग्रारोड कल्याण'' येथे जाण्यासाठी रवाना झालो व रामदेव हॉटेलचे परिसरात १२.०५ वाजता पोहचलो. वपोनिरी/चेतना चौधरी यांनी दिलेल्या सुचना प्रमाणे आम्ही सर्वजण रामदेव हॉटेल जवळ, आजुबाजुस दबा धरून बसलो. तसेच पंच क्र १, २ व बनावट ग्राहक असे

''रामदेव हॉटेल समोर, सहजानंद चौक, आग्रारोड कल्याण (प)'' उभे होते. काही वेळातच एक रिक्षा त्याचे जवळ येवुन थांबली असता व ते आपसात बोलताना दिसले. बनावट ग्राहकाने पैशाची पिशवी रिक्षात बसलेल्या व्यक्तीकडे दिली व पंच क्र.१ हिने बाळ ताब्यात घेतले व लागलीच बनावट ग्राहक याने ठरल्या प्रमाणे हात हलवुन सांकेतिक इशारा केला असता वपोनिरी/चंतना चौधरी मॅडम व पोलीस पथक यांनी रिक्षाला गराडा घालुन त्या महिलांना व पुरूषा पंचा समक्ष ताब्यात घेतले. त्यानंतर वपोनिरी/चेतना चौधरी यांनी त्यांना स्वत:ची, पंचाची व बनावट ग्राहक व पोलीस पथकाची ओळख करून देवुन, तेथे येण्याचा उद्देश समजावुन सांगितला. त्यानंतर वपोनिरी/चेतना चौधरी यांनी पंचा समक्ष १४.१० वाजता ताब्यात घेतलेल्या महिला व पुरूषांचे नाव व पत्ते विचारले असता त्यांनी त्यांची नावे व पत्ते सांगितले ती खालील प्रमाणे.

१) वैशाली किशोर सोनावणे वय— ३५ वर्षे, धंदा गृहीणी रा. सिध्दार्थ नगर, झोपडपट्टी, कोपररोड, समाज मंदिराचे बाजुला, विष्णुनगर, डोबिवली (दलाल व पैसे स्विकारणारी) मुळ गाव—मालेगाव, जि. नाशिक
२) सौ. दिपाली अनिल दुसिंग वय— २७ वर्षे, धुदा—गृहीणी, रा. रा. सिध्दार्थ नगर, झोपडपट्टी, कोपररोड, समाज मंदिराचे बाजुला, विष्णुनगर, डोबिवली, मुळ गाव—जेतोननगर, द्वारका हॉटेल, नाशिक
३) रेखा बाळु सोनावणे, वय—३२ वर्षे, धंदा भिक मागणे, रा. कल्याण रेल्वे स्टेशन, प्लॅट फॉर्म नं १ (तिच्या ताब्यात एक महिना १२ दिवस वयाचे स्त्री जातीचे लहान बाळ )
४) किशोर रमेश सोनावणे, वय—३४ वर्ष, धंदा—रिक्षा चालवणे, रा. सिध्दार्थ नगर, झोपडपट्टी, कोपररोड, समाज मंदिराचे बाजुला, विष्णुनगर, डोबिवली मुळ गाव—मालेगाव, जि. नाशिक

त्यानंतर सदरचे स्त्री जातीचे बालक याचे माता व बालक संरक्षण कार्ड (एसएनसीयु कार्ड) आरोपीत रेखा हिचेकडे मिळुन आले. त्यानुसार बाळाचे वय ४१ दिवस (जन्म दिनांक ३०/०९/२०२४) असे दिसुन आले. सदरचे कार्ड व जिल्हा रुग्णालय, ठाणे यांचे कडील रुग्ण नामे रेखा बाळु सोनावणे हिचेकडुन गुन्हयाचे तपासकामी ताब्यात घेण्यात आले आहे. वपोनिरी/चेतना चौधरी यांनी सदरचे बाळ हे मपोअम/२१७ एच. आर.थोरात यांचे ताब्यात देवुन महिला आरोपी व पुरुष आरोपी यांना पोलीस पथकाचे ताब्यात देवुन सदरचे ठिकाण रहदारीचे व वर्दळीचे असल्याने सदर ठिकाणी पंचनामा न करण्याचा व जवळच महात्मा फुले चौक जुने पोलीस स्टेशन असल्याने सदर ठिकाणी पंचनामा करण्याचा निर्णय घेवुन आम्ही सरकारी वाहन व मिळेल त्या रिक्षात बसवुन महात्मा फुले चौक जुने पोलीस स्टेशन आलो.

महात्मा फुले चौक जुने पोलीस स्टेशन कल्याण येथे पोहचल्या नंतर वपोनिरी/चेतना चौधरी मॅडम यांनी बनावट ग्राहक श्री. रफिक शेख यास पंचासमक्ष सदर ठिकाणी काय प्रकार झाला? असे विचारता त्याने सांगितले की, तो दिलेल्या सुचने प्रमाणे पंच यांचे सोबत कल्याण येथिल रामदेव हॉटेल समोर गेलो असता दलाल वैशाली हिने फोन करून सांगीतले की, मी, माझे पती किशोर, माझी बहीण दिपाली व बाळाची आई बाळासह थोडयाच वेळात रामदेव हॉटेल समोर आमचे रिक्षाने येत आहोत. तुम्ही रामदेव हॉटेल समोरच उभे रहा. लागलीच एक रिक्षा आमचे समोर आली सदर रिक्षामध्ये तिन महीला होत्या त्यातील वैशाली हिने तिची ओळख सांगुन रिक्षा चालक तिचा पती असल्याचे सांगितले. त्यानंतर रेखाकडे असलेले लहान बाळ हे विकण्यासाठी आणलेले असल्याचे सांगितल्याने तिने माझेकडे पैशाची मागणी केली. मी तिचेकडे प्रिरेड पंचनाम्याप्रमाणेचे ४,००,०००/— रू.चे सफेद रंगाचे पिशवीत गुडांळलेली रक्कम तीस दिली. ती तिने हातामध्ये ठेवली. त्यानंतर वैशाली हिने रेखा हिचे हातातील लहान बाळ महिला पंच यांचे ताब्यात दिले त्यानंतर मी ठरल्याप्रमाणे आपणास हाताने सांकेतिक इशारा केला. आपण पोलीस पथकासह लागलीच येवून आम्हास ताब्यात घेतले. अशी हकिकत सांगितली.

त्यानंतर पंचा सक्षम वपोनिरी/चेतना चौधरी यांनी वैशाली किशोर सोनावणे हिस सदरचे बाळ हे कोठुन आणले यांची विचारणा केली असता त्याचे सांगणे की, काही दिवसा पुर्वी माझी मामे बहीण दिपाली हिने मला सांगितले होते की, एक भिकारी महिला आहे तिला तिचे बाळ विकायचे आहे जर कोणाला बाळ विकत घ्यावयाचे असेल तर मला सांग. त्याप्रमाणे मी गुगल ॲप वर कोणाला बाळ विकत पाहीजे असेल तर मला संपर्क करा असा मॅसेज टाकला होता. त्याप्रमाणे मला एक दोन लोकांनी सपर्क साधला. आज दिनांक १२/११/२०२४ रोजी मला एका इसमाचा फोन आला व त्यांनी मला लहान बाळाची मागणी केली असता, मी त्यांना सांगितले की, माझेकडे एक महिन्याचे स्त्री जातीचे बालक आहे त्या बाळाची आई त्याची विक्री करणार असल्याचे सांगितले. त्यासाठी ४,००,०००/— रुपये रोख दयावे लागतील असे सांगितले असता त्यांनी होकार दिला तेव्हा मी सदर इसमास तुम्ही कल्याण येथिल रामदेव हॉटेलचे बाहेर या आम्ही बाळाला व तिचे आईला घेवुन येतो असे सांगितले. त्यानंतर लागलीच मी, माझे पती किशोर व मामे बहीण दिपाली असे आम्ही आमचे रिक्षातुन कल्याण रेल्वे स्टेशन येथे आलो तेथुन रेखा व तिचे बाळाला सोबत घेवुन रामदेव हॉटेल येथे आलो असता तेथे बाळाला विकत घेणारी पार्टी आली होती त्यांचेशी ओळख करुन घेवुन बाळ दाखवुन त्यांचेकडे पैशाची मागणी केली असता त्यांनी मला पैशाची प्लॅस्टिकची पिशवी माझेकडे दिली ती मी स्विकारली व माझे पत्नीला बाळ ताब्यात देण्यास सांगितले व ते ताब्यात देत असताना लागलीच काही खाजगी वेशातील पुरुष व महिला यांनी आम्हाला गराडा घालुन ते गुन्हे शाखेचे पोलीस असल्याबाबत सांगुन बाळा सकट आम्हास ताब्यात घेतले. त्याच्या ताब्यात मिळुन आलेल्या ४,००,०००/— रुपया पैशाबाबत विचारणा केली असता त्याने सांगितले की, १,९०,०००/— रु.( एक लाख नव्वद हजार रु.) मी व माझे पती

किशोर व माझी बहीण दिपाली हिस ६०,०००/—रु. (साठ हजार रु.) बाळाची आई रेखा हिस १,५०,०००/—रु. (एक लाख पन्नास हजार ) असे वाटुन घेणार होतो असे सांगितले.

वपोनिरी/चेतना चौधरी यांनी ताब्यात घेतलेल्या महिला आरोपीत यांनी स्वतंत्र कक्षात अंगझाडती घेतली असता, तिचे ताब्यात मिळुन आलेल्या वस्तुंचे वर्णन खालील प्रमाणे

**आरोपीत वैशाली किशोर सोनवणे हीचे ताब्यातुन जप्त करण्यात आलेला मुद्देमाल**

१) २,०००/— रु. रोख त्यात प्रिरेड पंचनाम्यात बनावट ग्राहक याचेकडे असलेली रोख रक्कम

२) ३,०००/—रू.किं.चा मोबाईल.

३) २०.००/—रू.इतर रोख रक्कम.

**आरोपीत किशोर रमेश सोनवणे याचे ताब्यातुन जप्त करण्यात आलेला मुद्देमाल**

४) १,०००/—रू.किं.चा मोबाईल फोन.

५) ३५,०००/—रू.किंमतीची ऑटो रिक्षा.

————————

**४१,०२०/—रू.एकूण**

**आरोपी नं २ व ३ यांचे अंगझडती घेतली असता त्यांचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने उपयुक्त असे काहीएक मिळुन आले नाही.**

वरिलप्रमाणे मिळुन आलेल्या नोटा, मोबाईल, हे वेग—वेगळया कागदांमध्ये सिलबंद करून त्यावर पंच व वपोनिरी/चेतना चौधरी यांनी सहयांचे लेबल चिटकवून सिलबंद करून जप्त केले. तसेच वरिल नमुद आरोपी क्र. २ ते ४ यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी आरोपी क्र. १ प्रमाणे मिळती जुळती हकिगत सांगितली आहे. वरिलप्रमाणे आरोपी व महिला आरोपी यांच्या ताब्यात मिळुन आलेले मोबाईल, हे वेगवेगळया कागदांमध्ये सिलबंद करून त्यावर आम्हा पंच व वपोनिरी/चेतना चौधरी यांनी सहयांचे लेबल चिटकवून सिलबंद करून जप्त केले. त्यावेळी मपोअंम/४६८४ के.एम.चांदेकर यांनी ऑडीओ व्हीडीओ शुटींग करण्यात आली असुन त्याची हॅशव्हॅल्यु काठण्यात आलेली आहे.

तरी दिनांक १२/११/२०२४ रोजी १४.१० वा ''रामदेव हॉटेल समोर, सहजानंद चौक, आग्रारोड कल्याण (प)'' १) वैशाली किशोर सोनावणे वय— ३५ वर्षे, धंदा गृहीणी रा. सिध्दार्थ नगर, झोपडपट्टी, कोपररोड, समाज मंदिराचे बाजुला, विष्णुनगर, डोबिवली (दलाल व पैसे स्विकारणारी) मुळ गाव—मालेगाव, जि. नाशिक २) सौ. दिपाली अनिल दुसिंग वय— २७ वर्षे, धुदा—गृहीणी, रा. रा. सिध्दार्थ नगर, झोपडपट्टी, कोपररोड, समाज मंदिराचे बाजुला, विष्णुनगर, डोबिवली, मुळ गाव—जेतोननगर, द्वारका हॉटेल, नाशिक ३) रेखा बाळु सोनावणे, वय—३२ वर्षे, धंदा भिक मागणे, रा. कल्याण रेल्वे स्टेशन, प्लॅट फॉर्म नं ४) किशोर रमेश सोनावणे, वय—३४ वर्ष, धंदा—रिक्षा चालवणे, रा. सिध्दार्थ नगर, झोपडपट्टी, कोपररोड, समाज मंदिराचे बाजुला, विष्णुनगर, डोबिवली मुळ गाव—मालेगाव, जि. नाशिक यांनी आपसात संगनमत करुन स्त्री जातीचे लहान बाळ वय अंदाजे ४१ दिवस हिची विक्री करण्यासाठी वर नमुद आरोपी यांनी आपआपसात संगणमत करून, बालकाच्या जन्माबाबत अगर दत्तक विधानाबाबत कोणत्याही प्रकारची कागदपत्रे न देता, खाजगी इसमाकडुन ४,००,०००/— रू. (२,०००/— रू किंमतीच्या भारतीय चलनातील ५०० रू दराच्या नोटा व कोरे कागद लावुन बनावट २ बंडल तयार केलेले) स्विकारून बाळ बनावट ग्राहकाच्या ताब्यात देवुन लहान बाळाची विक्री केली म्हणुन माझी वरील महिला आरोपी व पुरूष आरोपी यांच्या विरूध्द भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम १४३, ३(५) सह बाल न्याय ( मुलांची काळजी व संरक्षण ) अधिनियम २०१५ चे कलम ८१ व ८७ प्रमाणे सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील जबाब मी सांगितल्याप्रमाणे लॅपटॉपवर टंकलेखीत केला असून तो वाचून पाहिला असता बरोबर आहे.

समक्ष — हे लिहून देतो

पोलीस ठाणे अंमलदार
महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन

( भाग्यश्री हितेश पाटील )
मपोअंम/४७४५
AHTU, गुन्हे शाखा, ठाणे शहर